# संजय गांधी निराधार अनुदान योजना

**योजना कोणासाठी –** १८ ते ६५ वर्षे वयोगटातील आंधळे, पंगू, निराधार व्यक्ती, विकलांग मुले, गंभीर आजाराने ग्रस्त व्यक्ती, घटस्फोटीत व परित्यक्त्या महिला, बलात्कारीत किंवा शरीरविक्री व्यवसायातून सोडवलेल्या महिला आणि तृतीयपंथी व्यक्ती इ.

**योजनेची माहिती –**

- या योजनेचा लाभ ज्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न रु.२१०००/- पेक्षा कमी आहे अशा वरील वर्णनाप्रमाणेच्या व्यक्तींनाच मिळतो. या योजनेतील अर्जासोबत तलाठ्याचा उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
- या योजनेचा लाभ १८ ते ६५ वर्षांच्या आतील व्यक्तींनाच मिळतो. अर्जासोबत तलाठ्याने दिलेला वयाचा दाखला जोडावा लागतो अथवा मेडिकल ऑफिसरने दिलेला वयाचा दाखला जोडावा लागतो.
- या योजनेचा लाभ घेण्यासाठी ती व्यक्ती त्या ठिकाणची रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत तलाठ्याचा रहिवासी दाखला जोडावा लागतो. किमान १५ वर्षे या राज्यातील रहिवासी असणे आवश्यक.
- या योजनेचा लाभ शारीरिक अपंगत्वामुळे किंवा दुर्धर आजाराने आजारी असल्यामुळे घ्यायचा असल्यास सिव्हील सर्जन किंवा शासकीय रुग्णालयाचा मेडिकल सुपरिटेंडंट यांच्याकडून तसे सर्टिफिकेट घ्यावे लागते व अर्जासोबत जोडावे लागते.
- या योजनेची कार्यवाही प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणच्या तहसीलदार कार्यालयातून या योजनांसाठी नेमलेल्या ''संजय गांधी निराधार योजनेच्या'' कार्यालयातून होते. योजनेचे अर्ज तेथे उपलब्ध आहेत.
- या योजनेमध्ये प्रती व्यक्ती प्रती महिना रु.६००/- अनुदान दिले जाते. एकाच कुटुंबात एकापेक्षा जास्त व्यक्ती लाभार्थी असल्यास कुटुंबाला एकत्रीतपणे रु.९००/- प्रती महिना अनुदान दिले जाते. महिला लाभार्थी तिची मुले नोकरीला लागेपर्यंत किंवा २५ वर्षे वयाची होईपर्यंत यापैकी पहिल्या घटनेपर्यंत या अनुदानास पात्र राहते. महिला लाभार्थीला फक्त मुली असल्या तर त्या २५ वर्षांच्या झाल्या किंवा त्यांची लग्ने झाली तरी ती महिला लाभार्थी अनुदानाला पात्र राहते.

***

# श्रावण बाळ राज्य निवृत्ती सहाय्य योजना

## (व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दांसाठीची पेंशन योजना)

**योजना कोणासाठी –** ६५ वर्षांपुढील निराधार – निराश्रीत व्यक्तींसाठी ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२१०००/– पेक्षा कमी आहे किंवा जे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील आहेत (Below Poverty Line). वरील दोन्ही योजना एकत्रीतपणे राबवल्या जातात. दोन्ही योजनांचे नियम सारखेच आहेत.

**योजनेची माहिती –**

- या योजनेचा लाभ ज्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न रु.२१०००/– पेक्षा कमी आहे अशा व्यक्तींना तसेच जे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे सदस्य आहेत अशा व्यक्तींना मिळतो.या योजनेच्या अर्जाबरोबर अर्जदार व्यक्तीच्या उत्पन्नाचा दाखला व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा सदस्य असल्यास त्याचा पुरावा (पिवळे रेशनकार्ड) जोडणे आवश्यक आहे.
- या योजनेचा लाभ ६५ वर्षे पूर्ण असलेल्या वृध्द व्यक्तींनाच मिळतो. या योजनेच्या अर्जाबरोबर तलाठी किंवा मेडिकल अधिकाऱ्यांचा वयाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
- या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार किमान १५ वर्षे या राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. या योजनेच्या अर्जाबरोबर तलाठ्याचा रहिवास दाखला जोडणे आवश्यक आहे.
- या योजनेची कार्यवाही प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदार कार्यालयातून या योजनांसाठी नेमलेल्या ''संजय गांधी निराधार योजनेच्या'' कार्यालयातून होते. या योजनेचे अर्ज तेथे उपलब्ध आहेत.
- या योजनेमध्ये प्रती व्यक्ती प्रती महिना रु.६००/– अनुदान दिले जाते.
- श्रावण बाळ निवृत्ती सहाय्य योजना ही महाराष्ट्र शासनाची व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दांसाठीची पेंशन योजना ही केंद्र सरकारची योजना आहे, दोन्हीचा एकत्रीत फायदा अर्जदारांना दिला जातो.

**याच पध्दतीच्या अन्य दोन पेंशन योजना**

- इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग पेंशन योजना (१८ ते ६५ वर्षे वयातील अपंग व्यक्तींसाठी)
- इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेंशन योजना (४० ते ६५ वर्षे वयातील विधवांसाठी)

प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदार कार्यालयातील ''संजय गांधी निराधार योजनेच्या'' कार्यालयातून राबवण्यात येतात. या योजनांचे सर्व नियम वरील दोन योजनांच्या नियमांसारखेच आहेत. एका व्यक्तीला एका वेळी फक्त एकाच योजनेचा लाभ मिळतो.

***